Shamki Mata Shikshan & Krida Prasarak Mandal Umari Bk. Tq. Manora Dist. Washim

# SUDHAKARRAO NAIK ARTS, & UMASHANKAR KHETAN COMMERCE COLLEGE, AKOLA

Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati

# I YEAR STUDENT INDUCTION PROGRAMME

## 11 AUGUST 2025 TO 16 AUGUST 2025



# सुधाकरराव नाईक कला व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालयात सहा दिवशीय इंडक्शन प्रोग्राम यशस्वीरीत्या संपन्न

शिक्षणक्षेत्रातील अकोल्यातील अग्रगण्य संस्था असलेल्या सुधाकरराव नाईक कला व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सहा दिवशीय इंडक्शन प्रोग्राम चे आयोजन करण्यात आले. ११ ऑगस्ट ते १६ ऑगस्ट २०२५ या कालावधीत झालेला हा कार्यक्रम विविध माहितीपूर्ण सत्रांनी परिपूर्ण ठरला.

नवीन विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनाशी परिचित करून देणे, विविध विभागांची माहिती मिळवून देणे, शैक्षणिक व सहशैक्षणिक संधी समजावून सांगणे, तसेच व्यक्तिमत्व विकासासाठी उपयुक्त उपक्रमांकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधणे हे या इंडक्शन प्रोग्राममागचे प्रमुख उद्दिष्ट होते.


**Schedule of Induction Programme**

| Date | Time | Topic | Name of Resource Person |
|---|---|---|---|
| Monday 11/08/2025 | 9:00 am to 9:30 am<br><br>9:30 am to 11:00 am | Inaugural Speech<br><br>Introduction of Teachers | Officiating Principal<br>Dr. Bhaskar S. Patil<br>Individually Each Teacher |
| Tuesday 12/08/2025 | 9:00 am to 09:30 am<br>09:30 am-10.15 am<br><br>10.15 am-11.00 am | Introduction of Arts Faculty<br>Introduction of Commerce Faculty<br>Introduction to Modern Indian Languages | Prof N. F. Chavan<br>Dr. B. R. Chokhani<br><br>Dr. Eknath Khedkar & Prof. Jyoti Wankhade |
| Wednesday 13/08/2025 | 9:00 am to 09:30 am<br>09:30 am-10.15 am<br>10.15 am-11.00 am | NSS<br>Cultural<br>Admission/ Student Welfare and Scholarship Schemes | Dr. Sangita P. Tihile<br>Prof N. F. Chavan<br>Mr. Wasudeo Dhore |
| Thursday 14/08/2025 | 9:00 am to 09:30 am<br>09:30 am-10.15 am<br><br>10.15 am-11.00 am | Introduction of Library<br>Introduction of Sports & Physical Education Deptmt.<br>NEP | Prof. Amol B. Meshram<br>Dr Nitin W. Deulkar<br><br>Prof. Rahul K. Wadhwani |
| Friday 16/08/2025 | 9:00 am to 9:30 am<br><br><br>10:30 am-11.00 am<br><br>10.15 am-11.00 am | Internship, Career Katta, Aavishkar, Industrial Linkage<br>Competitive Exam Cell<br><br>Equal Opportunity Cell | Prof. Rashmi M. Motwani & Dr. Anant Rathod<br><br>Prof. S S. Gawarguru & Prof. H.T Jadhao<br>Mr. Umesh Rathod |
| Saturday 16/08/2025 | 11:00 am - 12:00 | Co-Curricular Activity. Student's Feedback and Valedictory | Prof N. F. Chavan & Prof. Kiran K. Sharma |

## उद्घाटन सोहळा : ११ ऑगस्ट २०२५

कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्कर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. आपल्या प्रभावी भाषणातून त्यांनी विद्यार्थ्यांना **"शिक्षण हीच खरी प्रगतीची गुरुकिल्ली"** असल्याचे सांगितले. प्राचार्यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम आणि समाजसेवा यातही सक्रीय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी स्वतःची व शिकविणाऱ्या विषयाची माहिती विद्यार्थ्यांसमोर मांडली. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत प्रश्न विचारले.






SNUK

Where tireless striving stretches its arms towards perfection

# I YEAR STUDENT INDUCTION PROGRAMME DAY - 1

## Introduction of Teachers



**Prof. N.F. Chavhan**
HOD Marathi



**Shri. A.B. Meshram**
Librarian



**Dr. N.W. Deulkar**
Director of Phy. Edu.

SNUK

Where tireless striving stretches its arms towards perfection

# I YEAR STUDENT INDUCTION PROGRAMME DAY - 1

## Introduction of Arts Teachers



**Dr. S.O. Tihile**
Sociology



**Dr. P.V. Sadanshiv**
Sociology



**Dr. R.B. Murumkar**
Political Science



**Prof. S.B. Kurhade**
Political Science



**Prof. Y.M. Chavhan**
History



**Prof. D.M. Waghmare**
History

SNUK
Where tireless striving stretches its arms towards perfection

# I YEAR STUDENT INDUCTION PROGRAMME DAY - 1

## Introduction of Arts Teachers



**Dr. E.W. Khedkar**
English



**Prof. V.S. Ingole**
English



**Prof. J.V. Wankhade**
English



**Prof. H.T. Jadhao**
English



**Prof. S.S. Gawarguru**
Economics



**Dr. A.S. Rathod**
Economics

SNUK
Where tireless striving stretches its arms towards perfection

# I YEAR STUDENT INDUCTION PROGRAMME DAY - 1

## Introduction of Commerce Teachers



**Prof. R.K. Wadhwani**
Commerce



**Dr. B.R. Chokhani**
Commerce



**Prof. R.M. Motwani**
Commerce



**Prof. K.K. Sharma**
Commerce

SHRI S.N. ARTS & U.K. COMM. COLLEGE
AKOLA

## विभागांची माहिती : १२ ऑगस्ट २०२५

दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील विविध विभागांची माहिती देण्यात आली.



प्रा. एन. एफ. चव्हाण यांनी कला विभागाची सविस्तर माहिती दिली. त्यांनी इंग्रजी व मराठी, मराठी साहित्य, समाजशास्त्र, राजकारणशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र अशा विषयांची उपयुक्तता व भविष्यातील संधींचे विवेचन केले.



डॉ. भारती चोखानी यांनी वाणिज्य विभागातील लेखाशास्त्र, व्यवस्थापन, बँकिंग यांसारख्या विषयांचे महत्त्व व सखोल ज्ञान विद्यार्थ्यांना दिले सांगितले.

SHRI S.N. ARTS & U.K. COMM. COLLEGE AKOLA





डॉ. एकनाथ खेडकर व प्रा. ज्योती वानखडे यांनी भाषा विभागाचे वैशिष्ठ्य अधोरेखित केले. भाषेचे प्रभुत्व हे व्यक्तिमत्व विकासासाठी अत्यावश्यक असून मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेच्या अभ्यासामुळे विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्व विकसित होईल, असे त्यांनी नमूद केले.




S.N. ARTS & U.K. COMM. COLLEGE AKOLA







SHRI S.N. ARTS & U.K. COMM. COLLEGE AKOLA

## एन.एस.एस (NSS) व सांस्कृतिक उपक्रम व शिष्यवृत्ती, परीक्षा फॉर्म बदल माहिती : १३ ऑगस्ट २०२५

दि. १३ ऑगस्ट २०२५ रोजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व सांस्कृतिक विभागाची ओळख विद्यार्थ्यांना करून देण्यात आली.



प्रा. एन. एफ. चव्हाण व डॉ. संगीता तिहीले यांनी NSS ची उद्दिष्टे, फायदे व समाजसेवेतील महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी NSS मध्ये सहभागी होऊन नेतृत्वगुण, जबाबदारीची जाणीव व सामाजिक संवेदनशीलता विकसित करावी, असे मार्गदर्शन त्यांनी केले.

सांस्कृतिक विभागातून नृत्य, संगीत, नाटक, वादविवाद, काव्यवाचन आदी उपक्रमांची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना लपलेल्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी हे व्यासपीठ उपयुक्त ठरते.

SHREE ... ARTS & U.K. COMM. COLLEGE
AKOLA





श्री. वासुदेव ढोरे व श्री. उमेश राठोड यांनी शिष्यवृत्ती, परीक्षा फॉर्म, एनरोलमेंट प्रक्रिया, बोनाफाईड सर्टिफिकेट यासंबंधीची शासकीय व प्रशासकीय माहिती दिली. या सत्रामुळे विद्यार्थ्यांना भविष्यातील अडचणी टाळण्यासाठी आवश्यक ज्ञान मिळाले.







ARTS & U.K. COMM. COLLEGE
AKOLA

## ग्रंथालय व शारीरिक शिक्षण : १४ ऑगस्ट २०२५

दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी ग्रंथालय व क्रीडा विभागाविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.



डॉ. अमोल मेश्राम यांनी ग्रंथालयातील विविध संदर्भग्रंथ, मासिके, संशोधन जर्नल्स व डिजिटल लायब्ररी यांची माहिती दिली. त्यांनी नियमित वाचनामुळे विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास होतो, असे स्पष्ट केले.



डॉ. नितीन देऊळकर, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख, यांनी विद्यार्थ्यांना विद्यापीठीय स्तरावर होणाऱ्या विविध खेळांमध्ये सहभाग घेण्याचे आवाहन केले. खेळामुळे शरीर निरोगी राहते तसेच नोकरी मिळविण्याची संधी प्राप्त होते. या बदल मार्गदर्शन केले.

SHRI S.N. ARTS & U.K. COMM. COLLEGE AKOLA



प्रा. राहुल वाधवाणी यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP-2020) बाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. बहुपर्यायी विषय निवड, लवचिक अभ्यासक्रम, कौशल्याधारित शिक्षण व संशोधनाला मिळणारा प्रोत्साहन यावर त्यांनी प्रकाश टाकला.




S.N. ARTS & U.K. COMM. COLLEGE
AKOLA







SHRI S.N. ARTS & U.K. COMM. COLLEGE AKOLA

## करिअर व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन : १६ ऑगस्ट २०२५

दि. १६ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यार्थ्यांसाठी करिअर व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले.





प्रा. रश्मी मोटवानी व डॉ. अनंत राठोड यांनी विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, करिअर कट्टा, अविष्कार व इंडस्ट्रियल लिंकेज याविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन काळातच उद्योगजगताशी संपर्क साधून रोजगारक्षमतेसाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करावीत, असे त्यांनी सांगितले.





प्रा. संदेश गवारगुरू व प्रा. हर्षदा जाधव यांनी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची माहिती दिली. UPSC, MPSC, बँकिंग व इतर स्पर्धा परीक्षांसाठी केंद्रात उपलब्ध सुविधा, अभ्यासक्रम, ग्रंथसंपदा व मार्गदर्शक वर्ग याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

SHRI S.N. ARTS & U.K. COMM. COLLEGE AKOLA










SHRI S.N. ARTS & U.K. COMM. COLLEGE
AKOLA

विद्यार्थ्यांनी या संपूर्ण कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. "इंडक्शन प्रोग्राममुळे आम्हाला महाविद्यालयातील प्रत्येक विभागाची ओळख झाली आणि भविष्यातील अभ्यासाची दिशा ठरविणे सोपे झाले," असे विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. अनेक विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारून, चर्चेत भाग घेऊन सत्र अधिक संवादात्मक केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे योगदान राहिले. प्रत्येक प्राध्यापकाने आपल्या विषयाची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली तसेच उपयुक्त मार्गदर्शन केले. प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना शासकीय व कागदोपत्री प्रक्रियेबद्दल सोप्या भाषेत माहिती दिल्याने कार्यक्रम अधिक उपयुक्त ठरला.

## समारोप

दि. १६ ऑगस्ट २०२५ रोजी इंडक्शन प्रोग्रामचा समारोप झाला. सहा दिवस चाललेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनाची सखोल ओळख मिळाली. शैक्षणिक विभाग, ग्रंथालय, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम, NSS, करिअर संधी व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला.

नवागत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि प्राध्यापकवर्गाचे परिश्रम यामुळे हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरल्याचे समाधान महाविद्यालयीन प्रशासनाने व्यक्त केले.

S.N. ARTS, SCIENCE & U.K. COMM. COLLEGE AKOLA

OFFICIATING PRINCIPAL,
Sudhakarrao Naik Arts, Science &
Umashankar Khetan Commerce
College, AKOLA